दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - २ | अंक - १३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : ६ ऑक्टोबर २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : आश्विन ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : एकादशी तिथी (७ ऑक्टोबर रात्री १२:३४ पर्यंत) त्यानंतर द्वादशी तिथी नक्षत्र : आश्लेषा नक्षत्र (रात्री १०:१७ पर्यंत) त्यानंतर मघा नक्षत्र योग : सिद्ध योग (सकाळी ०७:१९ पर्यंत) त्यानंतर साध्य योग करण : भाव करण (दुपारी ०१:१९ पर्यंत) त्यानंतर बलवा करण चंद्र राशी : कर्क राशी (रात्री १०:१७ पर्यंत) त्यानंतर सिंह राशी सूर्य राशी : कन्या राशी अशुभ मुहूर्त: राहु काळ : दुपारी ०३:२४ ते सायंकाळी ०४:५३ पर्यंत

### भल्या पहाटे रस्ता स्वच्छ करता करताच आयुष्यात पडला अक्षरांचा उजेड...!

पुणे : भल्या पहाटेच्या अंधुक उजेडात हातात झाडू घेऊन रस्त्यावरील कचरा गोळा करत रस्ता चकाचक करायचा. रस्त्यावरचा केर दूर करतानाच एका चिमुरडीच्या आयुष्यात अक्षरांचा उजेडही पेरत आहे. स्वतः औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या महिला सफाई कामगाराच्या मुलाने तिला अक्षरांची वाट दाखवली. आता त्या वाटेवरून दुसऱ्याच्या मुलीलाही पुढे नेण्याची धडपड सुरू आहे.

## 'फॉर्म ६' मधील कोणत्याही बदलाला सर्वोच्च न्यायालयाची मंजुरी नाही; सरन्यायाधीशांचे निवडणूक आयोगाला खडे बोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

नवीन मतदारांच्या नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या 'फॉर्म ६' (Form 6) मधील कोणत्याही सुधारणा किंवा बदलाला सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली नाही, असे महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी दिले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही वादग्रस्त निर्णयांविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सुनावणी करताना सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हे वक्तव्य केले.

निवडणूक आयोगाकडून अधिकृत अहवाल प्राप्त झाल्यानंतर या फॉर्ममध्ये संसदेच्या मंजुरीशिवाय नेमके कोणी फेरबदल केले, याची सखोल तपासणी न्यायालय करणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने न्यायालयासमोर असा युक्तिवाद केला होता की, मतदार यादीच्या विशेष फेरतपासणी मोहिमेदरम्यान (SIR) ऑनलाईन फॉर्म ६ सोबत जोडण्यात आलेल्या नवीन नियमांना सर्वोच्च न्यायालयाच्या मे महिन्यातील एका निकालात वैध ठरवले गेले आहे. मात्र, सरन्यायाधीशांनी हा दावा फेटाळून लावत म्हटले, "सुधारित फॉर्म ६ ला आमच्याकडून कोणतीही मंजुरी देण्यात आलेली नाही, हे आम्ही स्पष्ट करतो. जेव्हा यासंबंधीचे मूळ रेकॉर्ड न्यायालयात सादर केले जातील, तेव्हा हे बदल नक्की कोणी केले हे आम्हाला पाहायचे आहे."

**नक्की वाद काय आहे?**

केंद्रीय निवडणूक आयोगाने नवीन मतदार नोंदणीसाठीच्या ऑनलाईन 'फॉर्म ६' मध्ये काही अतिरिक्त अटी व घोषणापत्र समाविष्ट केले होते. यानुसार, नवीन अर्जदारांना त्यांचे स्वतः चे, त्यांच्या पालकांचे किंवा आजी-आजोबांचे नाव मागील विशेष फेरतपासणी मोहिमेच्या (SIR) मतदार यादीत नोंदवले गेले होते की नाही, याची माहिती देणे बंधनकारक करण्यात आले होते. ही माहिती दिल्याशिवाय ऑनलाईन पोर्टलवर अर्ज सबमिट करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य करण्यात आले होते.

या बदलांमुळे पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांना नाहक त्रासाला आणि तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आक्षेप याचिकेत घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे, निवडणूक आयोगाचे अन्य दोन आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनीही या बदलांवर अधिकृतपणे गंभीर आक्षेप नोंदवले होते आणि हे बदल अनधिकृत असल्याचे म्हटले होते, अशी माहिती समोर आली आहे.

'फॉर्म ६' चे कायदेशीर महत्त्व काय?

'मतदार नोंदणी नियम, १९६०' अंतर्गत फॉर्म ६ हा एक वैधानिक दस्तऐवज आहे. देशात नवीन मतदार म्हणून नाव नोंदवण्यासाठी किंवा मतदार यादीत पुन्हा नाव समाविष्ट करण्यासाठी याच फॉर्मचा वापर केला जातो. लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार, या फॉर्मच्या रचनेत किंवा अनिवार्य अटींमध्ये कोणताही कायदेशीर बदल करण्यासाठी केंद्र सरकारची रीतसर अधिसूचना आणि त्याला संसदेची मंजुरी असणे बंधनकारक असते. निवडणूक आयोग आपल्या प्रशासकीय अधिकारात अशा वैधानिक फॉर्ममध्ये एकतर्फी बदल करू शकत नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला आहे.

### सारांश वृत्त

## कपडे फाडले, केस धरून बेसमेंटमध्ये फरफटत नेले, नाइटक्लबमध्ये महिलेला...! ७ जणांना अटक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

आसाममधील गुवाहाटी येथील खानापारा परिसरातील एका नाइटक्लबमध्ये महिलेला अत्यंत अमानुष मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. 'द लोकल्स' नावाच्या कॅफे अँड लाऊंजमध्ये गुरुवारी रात्री उशिरा मद्यधुंद अवस्थेत झालेल्या किरकोळ वादानंतर, क्लबच्या बाउन्सर्सने संबंधित महिलेचे कपडे फाडून तिला बेदम मारहाण केली.

सोशल मीडियावर घटनेचा व्हिडिओ व्हायरल –

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडओमध्ये पीडित महिला विवस्त्रावस्थेत जमिनीवर पडलेली दिसते. तिला २ इतर महिला आणि काही पुरुष लाथा मारताना दिसत आहेत. गुवाहाटीचे माजी पोलीस उपआयुक्त (उझ) तबू राम पेगू यांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास काही लोकांच्या टोळक्याने संबंधित पीडितेवर हल्ला केला. तिचे केस आणि कपडे खेचून तिला चौथ्या मजल्यावरून थेट बेसमेंटमधील पार्किंग परिसरात फरफटत नेण्यात आले. ती तेथेच गंभीर मारहाणीमुळे बेशुद्धावस्थेत पडली होती.

मॅनेजर, ३ महिला बाउन्सर्ससह ७ जणांना अटक –

महत्वाचे म्हणजे, दिसपूर पोलिसांनी स्वतःहून दखल घेत, या प्रकरणी कारवाई करत नाइटक्लबचा मॅनेजर, इव्हेंट मॅनेजर, फ्रंट ऑफिस एक्झिक्युटिव्ह आणि बाउन्सर्ससह एकूण ७ जणांना अटक केली आहे. यांत तीन ३ महिलांचाही समावेश आहे.

## एमपीएससीच्या घोळावर सरकारचा मोठा डाव; अध्यक्ष-सदस्यांवर कारवाईसाठी विशेष समिती!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावरून सुरू असलेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. एमपीएससीचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्यांविरोधात संविधानाच्या कलम ३१७ अंतर्गत कारवाई करण्यासाठी विशेष समिती गठित करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि अहवालातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

एमपीएससीच्या विविध परीक्षांमध्ये सातत्याने अनियमितता आणि गोंधळाच्या तक्रारी समोर येत असताना सरकारने हे पाऊल उचलले आहे. पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या आंदोलनाला नेतृत्व दिले आहे.

आंदोलकांकडून आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे एमपीएससीच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मात्र, विशेष समिती स्थापन करण्याची शिफारस म्हणजे दोष सिद्ध झाल्याचा अर्थ नाही; समितीच्या चौकशीनंतरच पुढील कारवाईचे स्वरूप स्पष्ट होईल.

परीक्षांच्या आयोजनापासून निकाल आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींपर्यंत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे राज्यातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा मुद्दा आता अधिक गंभीर बनला आहे.

## उपवासही महागला! भगर २२० रुपयांवर, तेल ४० रुपयांनी महाग; सणासुदीत गृहिणींचे बजेट कोलमडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी



नवरात्रोत्सवाच्या तोंडावर सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराला महागाईचा आणखी एक धक्का बसला आहे. उपवासासाठी वापरली जाणारी भगर प्रथमच किलोमागे २२० रुपयांपर्यंत पोहोचली असून गेल्या वर्षाच्या तुलनेत तिच्या दरात तब्बल ८० ते १०० रुपयांची वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. शेंगदाणा तेलाच्या दरातही सुमारे ४० रुपयांची वाढ झाली आहे.

पावसाचे कमी प्रमाण आणि वाढती मागणी याचा परिणाम उपवासाच्या पदार्थांच्या किमतीवर झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे. नवरात्रोत्सवात उपवास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने भगर, साबुदाणा आणि इतर फराळाच्या पदार्थांना मागणी ३० ते ४० टक्क्यांनी वाढते. रेडिमेड फराळाच्या पदार्थांच्या किमतीतही १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.

महागाईचा फटका केवळ उपवासापुरता मर्यादित नाही. तूरडाळ १२० रुपयांवरून १६० रुपये किलो, हरभरा डाळ ८० वरून १०० रुपये किलो झाली आहे. तांदळाचे दरही ४८-६० रुपयांवरून ५५-६५ रुपयांपर्यंत गेले आहेत.

सणासुदीच्या काळात मागणी वाढणे स्वाभाविक असले तरी दरवाढीचा थेट भार ग्राहकांच्या खिशावर पडत आहे. त्यामुळे 'सण साजरा करायचा तरी किती खर्चात?' हा प्रश्न आता सर्वसामान्य कुटुंबांसमोर उभा राहिला आहे.

## २ लाख अंगणवाडी कर्मचारी रस्त्यावर; 'सरकारी कर्मचारी'चा दर्जा कधी? आज राज्यव्यापी संप!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील सुमारे दोन लाख अंगणवाडी कर्मचारी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी ६ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लाक्षणिक संप पुकारणार आहेत. महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर दुपारी दोन वाजता शक्तिप्रदर्शन आणि जेल भरो आंदोलन करण्यात येणार आहे.

राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत सुमारे १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत. सहा महिने ते सहा वर्षांपर्यंतच्या बालकांना पूरक पोषण, अनौपचारिक शिक्षण तसेच गरोदर आणि स्तनदा मातांना पोषण व आरोग्यविषयक सेवा देण्याची महत्त्वाची जबाबदारी या कर्मचाऱ्यांवर आहे.

मात्र, या सेवांबरोबरच निवडणूक कामे, मातृवंदना, लेक लाडकी, लाडकी बहीण, घरकुल योजना आणि दिव्यांग बालकांचे सर्वेक्षण यांसारखी अतिरिक्त कामेही त्यांच्यावर सोपवली जात असल्याचा संघटनेचा आरोप आहे.

दररोज आठ ते दहा तास काम करूनही शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला जात नसल्याचा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे. मासिक पेन्शन आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रॅच्युइटीचा लाभ देण्याची मागणीही प्रलंबित आहे.

मुख्यमंत्र्यांसोबत बैठका होऊनही ठोस आदेश निघत नसल्याने आता अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याच मागण्यांकडे सरकार किती काळ दुर्लक्ष करणार, हा प्रश्न यानिमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## राज्यसभा यादीने मोदींच्या मंत्रिमंडळात खळबळ; हरदीप पुरी आणि बी. एल. वर्मांना पुन्हा संधी नाही?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

भाजपने राज्यसभा निवडणुकीसाठी आणखी आठ उमेदवारांची घोषणा केल्यानंतर केंद्रातील राजकीय समीकरणांबाबत चर्चेला वेग आला आहे. या यादीत केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी आणि राज्यमंत्री बनवारी लाल वर्मा यांची नावे नसल्याने त्यांच्या मंत्रिपदाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हरदीप सिंह पुरी यांना २०२० मध्ये राज्यसभेवर पाठवण्यात आले होते आणि त्यांचा कार्यकाळ २५ नोव्हेंबर २०२६ रोजी संपणार आहे. बनवारी लाल वर्मा यांनाही २०२० मध्ये उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर पाठवण्यात आले होते. यावेळी भाजपने दोघांनाही उमेदवारी न दिल्याने पुढील मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेला जोर आला आहे.

उत्तर प्रदेशातील उमेदवार निवडीत जातीय आणि राजकीय समीकरणांचा विचार



केल्याचे स्पष्ट दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर स्मृती इराणी, वरुण गांधी, संजीव बाल्यान आणि कवी कुमार विश्वास यांच्या नावांचीही चर्चा होती. मात्र, भाजपच्या अधिकृत यादीत या नावांनाही स्थान मिळालेले नाही.

राज्यसभा उमेदवारी आणि मंत्रिपद यांचा थेट संबंध प्रत्येक वेळी असतोच असे नाही. त्यामुळे पुरी आणि वर्मा यांचे मंत्रिपद निश्चितपणे जाणार,

असा अंतिम निष्कर्ष अधिकृत निर्णय होईपर्यंत काढणे घाईचे ठरेल. मात्र, भाजपच्या नव्या राजकीय गणितात काही विद्यमान चेहऱ्यांची जागा बदलण्याची शक्यता या यादीने नक्कीच अधोरेखित केली आहे.

## आदिवासी विद्यार्थी आंदोलनावर तीव्र राजकीय संघर्ष; मध्यरात्रीच्या पोलीस कारवाईवरून महायुती सरकार अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

नाशिकहून सुमारे १८० किलोमीटरची पायपीट करत मुंबईत आलेल्या शेकडो आदिवासी विद्यार्थी आणि एनएसयूआय (NSUI) कार्यकर्त्यांवर मुंबई पोलिसांनी मध्यरात्री केलेल्या कारवाईमुळे राज्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. दादर येथील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय असलेल्या 'टिळक भवन'मध्ये आश्रयाला आलेल्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने काँग्रेससह विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सरकारवर 'आदिवासी विरोधी' असल्याचा घणाघाती आरोप केला आहे.

**आंदोलनाचे नेमके कारण काय?**

आदिवासी शासकीय वसतिगृहे आणि आश्रमशाळांमध्ये अपुऱ्या मूलभूत सुविधा, रखडलेली शिष्यवृत्ती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न या मागण्यांसाठी हे विद्यार्थी मागील अनेक दिवसांपासून नाशिकमध्ये आंदोलन करत होते. आदिवासी विकास विभागाचे आयुक्त आणि मंत्री अशोक उईके यांच्या प्रशासकीय अपयशामुळे या विद्यार्थ्यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. उपोषणानंतरही न्याय न मिळाल्याने हे विद्यार्थी शांततापूर्ण आंदोलनासाठी मुंबईच्या आझाद मैदानाकडे निघाले होते.

**काँग्रेस कार्यालयातील मध्यरात्रीची कारवाई व वाद**

मुंबईत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने काँग्रेस पक्षाने त्यांना दादरच्या 'टिळक भवन' कार्यालयात रविवारी रात्री आश्रय दिला होता. हे विद्यार्थी सोमवारी पहाटे आझाद मैदान किंवा लोकभवनाच्या दिशेने मोर्चा काढण्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी मध्यरात्रीनंतर कोणतीही



पूर्वपरवानगी किंवा वॉरंट नसताना थेट पक्ष कार्यालयात प्रवेश केला, असा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे. पोलिसांनी विद्यार्थ्यांचे फोटो काढून त्यांना धमकावले व बळाचा वापर करून ताब्यात घेतले, असा दावा केला जात आहे.

दुसरीकडे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि संवेदनशील भागात बेकायदेशीर गर्दी रोखण्यासाठी नियमानुसारच ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. आंदोलनाला कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

**'दुसऱ्यांसाठी नियम वेगळे का?' – राजकीय वर्तुळात संतप्त प्रतिक्रिया**

या कारवाईवरून सत्ताधारी महायुती सरकारवर टीकेची झोड उठली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी तीव्र संताप व्यक्त करत, "महाराष्ट्रात लोकशाही आहे की जंगलाचा कायदा? पोलिसांना रात्रीच्या वेळी राजकीय कार्यालयात घुसून महिला व विद्यार्थ्यांना अटक करण्याचा अधिकार कोणी दिला?" असा सवाल केला. दिल्लीतून सरचिटणीस जयराम रमेश यांनीही निषेध नोंदवत हे सरकार पूर्णपणे आदिवासी विरोधी असल्याची टीका केली.

या संपूर्ण प्रकरणामुळे राज्यातील विद्यार्थ्यांचे प्रश्न, आंदोलनाचे स्वातंत्र्य आणि प्रशासकीय भूमिकेवरून पुन्हा एकदा मोठा संघर्ष पेटला असून आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची चिन्हे आहेत.

## संपादकीय

### निवडणूक आयोगाचा वाद आणि विरोधकांची राजकीय कसोटी: एक सर्वसमावेशक विश्लेषण

**मुख्य प्रस्तावना आणि पार्श्वभूमी**

भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवरून निर्माण झालेला वाद सध्या देशाच्या राजकारणात केंद्रबिंदू ठरला आहे. मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल उजळणी' (**Special Intensive Revision - SIR**) मोहिमेअंतर्गत कोट्यवधी मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप विरोधकांकडून होत आहे. या वादानंतर निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. हा वाद केवळ एका प्रशासकीय निर्णयापुरता मर्यादित नसून, यामुळे देशाच्या राजकारणाला नवी दिशा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

**महाराष्ट्रातील 'ठाकरे बंधूंचे' आक्रमक राजकारण**

या देशव्यापी वादाचे लोन महाराष्ट्रात सर्वाधिक तीव्रतेने पसरले आहे. मुंबईच्या पटलावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे 'ठाकरे बंधू' राजकीय मतभेद बाजूला सारून या मुद्द्यावर एकत्र आले आहेत. त्यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली मोठे मोर्चे आणि आंदोलने काढण्यात येत आहेत. मराठी मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळली जात असल्याचा दावा करत त्यांनी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाविरुद्ध रणशिंग फुंकले आहे. या राजकीय घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन समीकरणांची पायाभरणी होत असून, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा बदल मानला जात आहे.

**दिल्लीतील जंतर-मंतरवरील संघर्ष आणि भाजपची रणनीती**

महाराष्ट्राप्रमाणेच राजधानी दिल्लीतही याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. युवक काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि विविध डाव्या संघटनांनी जंतर-मंतरवर एकत्र येत तीव्र निदर्शने केली. आंदोलकांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाला आणि पोलिसांना सुरक्षेच्या कारणास्तव जंतर-मंतर परिसरात जमावबंदी लागू करावी लागली.

दुसरीकडे, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने (**BJP**) या संपूर्ण वादावर अत्यंत सावध आणि 'शांत' राहण्याची रणनीती स्वीकारली आहे. विरोधकांच्या या आक्रमक आंदोलनांना थेट प्रत्युत्तर देणे टाळून, भाजपने संपूर्ण लक्ष आगामी विधानसभा निवडणुकांच्या व्यवस्थापनावर केंद्रित केले आहे. सत्ताधाऱ्यांच्या या मूक धोरणामुळे राजकीय वातावरण आणखीनच तापले आहे.

**२०२९ ची लढाई आणि विरोधकांची खरी परीक्षा**

सध्या सुरू असलेले हे रस्तेवरील संघर्ष, मोर्चे आणि आंदोलने विरोधकांसाठी तात्कालिक मुद्दा ठरू शकतात, परंतु भारतीय राजकारणाच्या दीर्घकालीन चित्राचा विचार केल्यास एक कठोर वास्तव समोर येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या राजकीय यंत्ररचना आणि जनाधाराचा मुकाबला करण्यासाठी केवळ निवडणूक आयोगाच्या विरोधात आवाज उठवणे पुरेसे नाही.

जर विरोधकांना खरोखरच देशाच्या राजकारणात आणि व्यवस्थेतमूलभूत व परिवर्तनवादी बदल घडवायचा असेल, तर त्यांना नरेंद्र मोदी यांच्या विरोधात अत्यंत कठीण, नियोजनबद्ध आणि धोरणात्मक मेहनत घ्यावी लागेल. केवळ आंदोलने करून किंवा संस्थात्मक संघर्षावर विसंबून चालणार नाही, तर तळागाळात मजबूत संघटना बांधणी करावी लागेल.

येत्या २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाला थेट राजकीय मैदानात पराभूत केल्याशिवाय देशात कोणताही खरा किंवा मोठा बदल घडणे शक्य नाही. त्यामुळे विरोधकांची खरी कसोटी २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला पराभवाची धूळ चारण्यातच आहे.

# मराठीच्या अभिजाततेला व्यवहाराच्या भाषेचे बळ देणे हीच खरी जबाबदारी

## मराठी भाषेचा प्रवास' परिसंवादात भाषातज्ज्ञ, साहित्यिक व मान्यवरांचे विचार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांपासून संत तुकारामांच्या अभंगांपर्यंत, नाणेघाटातील प्रस्तरलेखांपासून आधुनिक साहित्य व डिजिटल माध्यमांपर्यंत मराठीचा प्रवास हा केवळ भाषेचा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, विचारविश्वाचा आणि लोकजीवनाचा प्रवाह आहे. मराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा या प्रदीर्घ परंपरेचा गौरव आहे; मात्र हा गौरव केवळ उत्सव आणि सोहळ्यांपुरता मर्यादित न राहता मराठीला घराघरांत, शाळांमध्ये, प्रशासनात, ज्ञान-विज्ञानात, तंत्रज्ञानात आणि दैनंदिन व्यवहारात स्थान मिळवून देणे हीच खरी जबाबदारी आहे, असा सूर 'मराठी भाषेचा प्रवास' या परिसंवादातून उमटला.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'च्या तिसऱ्या दिवशी आचार्य अत्रे रंगमंच येथे परिसंवाद झाला. प्रकाश निर्मळ, कैलास भैरट, प्रा. कल्पना क्षीरसागर, प्रदीप कदम आणि श्रीकांत चौगुले यांनी मराठीच्या आदिम प्रवाहापासून आजच्या बदलत्या भाषिक वास्तवापर्यंत विविध पैलूंवर विचार मांडले. अध्यक्षस्थानी श्रीकांत चौगुले होते. महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वयक किरण गायकवाड यांच्यासह साहित्यिक, अभ्यासक, मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

मराठी ही एका प्रवाहातून निर्माण झालेली भाषा नसून विविध भाषिक प्रवाहांच्या देवाणघेवाणीतून ती समृद्ध होत गेली आहे. प्राचीन प्रस्तरलेख, गाथा सप्तशती, संतसाहित्य, लोकपरंपरा, म्हणी-वाक्प्रचार, ओव्या आणि विविध बोलीभाषांनी मराठीच्या शब्दसंपदेला आणि सांस्कृतिक आशयाला समृद्ध केले. मालवणी, वऱ्हाडी यांसह महाराष्ट्राच्या विविध भागांतील बोली या प्रमाण मराठीपासून वेगळ्या वाटा नसून तिच्या समृद्धीच्या मुळाशी असलेले जिवंत झरे आहेत, असे वक्त्यांनी स्पष्ट केले.

अभिजातत्व म्हणजे अभिजनत्व नव्हे, तर पिढ्यान्पिढ्या लोकांच्या ओठांवरून प्रवाहित होत आलेली जीवनस्पर्शी समृद्धी होय. लोकांच्या सुख-दुःखांना, श्रमांना, भक्तीला, संघर्षांना आणि स्वप्नांना शब्द देत भाषा विकसित होत असते. त्यामुळे मराठीचे अभिजातत्व तिच्या लोकजीवनाशी असलेल्या अतूट नात्यात आणि सर्वसमावेशकतेत आहे, असे मत परिसंवादात व्यक्त झाले.

प्रदीप कदम यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह संत, साहित्यिक आणि कवींनी मराठीच्या विकासात दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोशा'च्या माध्यमातून प्रशासनाच्या व्यवहारात मराठीला स्थान देण्याचा केलेला प्रयत्न हा भाषिक स्वाभिमानाचा महत्त्वपूर्ण अध्याय असल्याचे त्यांनी सांगितले. भाषेचे अस्तित्व केवळ ग्रंथांच्या पानांवर नसते, तर तिच्या दैनंदिन वापरातून ती जिवंत राहते. त्यामुळे घर, शाळा, कार्यालय आणि सार्वजनिक व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

आजच्या पिढीच्या भाषिक संस्कारांवर एफएम, दूरदर्शन आणि डिजिटल माध्यमांचा मोठा प्रभाव आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजीचा वाढता संकर ही बदलत्या काळाची वस्तुस्थिती आहे. त्याकडे केवळ चिंतेच्या दृष्टिकोनातून न पाहता नव्या माध्यमांमध्ये मराठीचा प्रभावी, सर्जनशील आणि आधुनिक वापर वाढवून ती तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे कदम यांनी सांगितले.

प्रा. कल्पना क्षीरसागर यांनी मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा शास्त्रीय दृष्टिकोनातून वेध घेतला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई यांसह संत-कवी आणि साहित्यिकांनी मराठीच्या शब्दांना अर्थाबरोबरच भावना, संस्कार आणि सांस्कृतिक आशय दिला. हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटल माध्यमे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात श्रीकांत चौगुले यांनी भाषेचा प्रवाह नदीसारखा असल्याचे सांगितले. वाटेत येणाऱ्या विविध प्रवाहांना सामावून घेत नदी अधिक विस्तीर्ण आणि समृद्ध होते, त्याचप्रमाणे विविध भाषांच्या संपर्कातून मराठीचा विकास झाला. महाराष्ट्राच्या बदलत्या सीमा आणि कन्नडसह इतर भाषांशी झालेल्या संपर्काचा मराठीवर प्रभाव पडला. 'अण्णा', 'आप्पा' यांसारखे व्यवहारातील शब्द भाषिक देवाणघेवाणीतून मराठीत रूढ झाले. परभाषेतून आलेला शब्द समाजाच्या वापरातून आपलासा झाला की तो मराठीच्या शब्दभांडाराचा भाग बनतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

मातृभाषा ही केवळ संवादाचे साधन नसून भावना, संस्कार आणि आत्मीयतेला शब्द देणारे पहिले माध्यम आहे. बालपणी कानावर पडणाऱ्या भाषेतून व्यक्तिमत्त्वाचे अनेक संस्कार घडतात. त्यामुळे बदलत्या माध्यमविश्वात मराठीचे स्वरूप आणि भाषिक संकर यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे चौगुले यांनी सांगितले.

इतिहास हा केवळ मागे वळून पाहण्यासाठी नसून पुढचा मार्ग दाखविणारा दीप आहे. मराठीच्या भूतकाळातील प्रवाहांचा अभ्यास करून वर्तमानातील बदल समजून घेणे आणि त्यातून भाषेच्या भविष्याचा वेध घेणे आवश्यक आहे. या परिसंवादात इतिहास, बोलीभाषा, साहित्य, भाषाविज्ञान आणि आधुनिक माध्यमांतील आव्हाने अशा विविध अंगांनी मराठीचा विचार मांडण्यात आला.

मराठीचे पाईक म्हणून लिहिणे, बोलणे, वाचणे आणि ऐकणे या प्रत्येक कृतीतून भाषेचे जतन करण्याची जबाबदारी आपली आहे. विशेषतः तरुण पिढीच्या मनावर मराठीचा जिव्हाळ्याचा स्वर पोहोचविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे आवाहन चौगुले यांनी केले.

मराठीला अभिजाततेचा मुकुट लाभला आहे; आता त्या मुकुटाला व्यवहारातील वापराचे तेज देण्याची वेळ आली आहे.

इतर भाषांचे ज्ञान आणि सन्मान राखत मातृभाषेशी नाते अधिक घट्ट करणे, घराघरांत मराठीचा सहज वापर वाढविणे आणि तंत्रज्ञानाच्या नव्या विश्वात मराठीसाठी नवी दालने खुली करणे ही काळाची गरज आहे. मराठी ही केवळ इतिहासाची साक्षीदार न राहता वर्तमानाची भाषा आणि भविष्याची दिशादर्शक भाषा बनावी, हाच परिसंवादाचा मुख्य संदेश ठरला.



# चाकण एमआयडीसीत साडेतीन टन वजनाचा लोखंडी पोल अंगावर पडून कामगार गंभीर; कंपनी प्लँट हेडसह तिघांवर सदोष मनुष्यवधाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

चाकण एमआयडीसी परिसरातील 'वेलॉक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.' या कंपनीत सुरक्षेच्या उपाययोजनांचा पूर्ण बोजवारा उडाल्यामुळे एका निष्पाप कामगाराचा जीव टांगणीला लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. निष्काळजीपणे क्रेनने साडेतीन टन वजनाचा महाकाय लोखंडी पोल उचलत असताना पोल अंगावर कोसळल्याने मोनू शर्मा हा कामगार गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी चाकण दक्षिण पोलिसांनी कंपनीचा प्लँट हेड, ठेकेदार/सुपरवायझर आणि क्रेन ऑपरेटर अशा तिघांविरोधात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११० व ३(५) अन्वये सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ११.३० वाजेच्या सुमारास नाणेकरवाडी येथील 'वेलॉक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.' या कंपनीत साडेतीन टन वजनाचा अवजड लोखंडी पोल हलवण्याचे काम सुरू होते. काम करताना कामगाराचा जीव जाऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही कंपनी प्रशासनाने कोणतीही सुरक्षा यंत्रणा दिली नव्हती.

साडेतीन टनाचा पोल उचलण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ, सुरक्षित लिफ्टिंग व्यवस्था, स्वतंत्र क्रेन ऑपरेटर अथवा पोल सुरक्षितपणे पलटी करण्यासाठी आवश्यक साधनसामग्रीची व्यवस्था करण्यात आली नव्हती. परिणामी, क्रेनने पोल उचलत असताना अचानक तो खाली कोसळला आणि कामगार मोनू शर्मा यांच्या अंगावर पडला. या भीषण अपघातात मोनू शर्मा गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**यांच्यावर दाखल झाला गुन्हा:**

पोलीस साहाय्यक उपनिरीक्षक राहुल नागनाथ पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे:

स्वप्निल सुरेश जाधव (वय ३५ वर्षे, रा. नाणेकरवाडी, खेड - व्यवसाय: प्लँट हेड, वेलॉक्स इन्फ्रास्ट्रक्चर)

निरंजन सरत नायक (वय ४२ वर्षे, रा. डी. के. चौक, निघोजे रोड - व्यवसाय: कॉन्ट्रॅक्टर/सुपरवायझर)

योगेश महोदव आमले (वय ४७ वर्षे, पत्ता उपलब्ध नाही - व्यवसाय: क्रेन ऑपरेटर)

कंपनी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे कामगारांचा जीव धोक्यात घालणाऱ्या अशा व्यवस्थापनावर आता पोलिसांनी कडक पावले उचलली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धायगुडे आणि मोते करत आहेत.

# पवना बंद जलवाहिनी, मोशी कचरा डेपोबाबत निर्णय घ्या

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी : प्रतिनिधी**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा दौरा दोन दिवसांपूर्वी झाला. त्यात आमदार, पक्ष आणि महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी विविध विषय मांडले. शहरातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली. पवना बंद जलवाहिनीसह मोशी कचरा डेपोबाबत शासनाने निर्णय घ्यावा, हे प्रकल्प मार्गी लागावेत, अशी मागणी केली.

झपाट्याने वाढत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरासाठी पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शहराला स्वच्छ तसेच अतिरिक्त १०० एमएलडी पाणी मिळणार आहे. त्या रखडलेल्या प्रकल्पासह मोशी कचरा डेपोत दुर्घटनेनंतर तेथे तातडीने उपाययोजना करण्याबाबत सत्ताधारी भाजप आक्रमक भूमिकेत आहे. या दोन मुद्द्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन कायमचा तोडगा काढण्यासंदर्भात मागणी केली आहे.

मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेमुळे महापालिकेची बदनामी झाली असून, शहरात कचरा समस्या निर्माण झाली आहे. त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी तसेच, कचरा प्रक्रिया केंद्र व प्रकल्प मार्गी लावणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शहराची स्थिती पूर्ववत होणार नाही. तसेच, कचऱ्याचे डोंगर कमी होणार नाहीत, असे स्पष्ट मत पदाधिकाऱ्यांनी मांडले. लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावली जाईल. त्यात अंतिम तोडगा काढला जाईल, असे आश्वासन चव्हाण यांनी दिले.

# तळेगाव दाभाडे - सोसायटीच्या गेटवर सुरक्षा रक्षकावर दगडफेक

## तळेगाव दाभाडे हादरले! घरभाडे वाढवल्याच्या रागातून सोसायटीच्या गेटवर सुरक्षा रक्षकावर दगडाने जीवघेणा






तळेगाव दाभाडे: घरमालकाने भाडे वाढवल्याचा राग अनावर झाल्याने एका भाडेकरूने थेट सोसायटीच्या गेटवर जाऊन सुरक्षा रक्षकाला (सिक्युरिटी सुपरवायझर) दगडाने बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना 'रोहन आनंद सोसायटी', सोमाटणे फाटा येथे घडली आहे. याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५:३० च्या सुमारास आरोपी मोहित देशमुख (वय ३०, रा. रोहन आनंद सोसायटी, सोमाटणे फाटा) याने घरमालकाने भाडे वाढवल्याच्या कारणावरून वाद घातला. त्यानंतर त्याने सोसायटीच्या मुख्य गेटवर जाऊन तेथील सिक्युरिटी सुपरवायझर अनोध कुमार वर्मा (वय २८) आणि सिक्युरिटी पुष्पेंद्र अहिरवार यांना शिवीगाळ व दमदाटी केली. वाद सोडवण्यास गेलेल्यांवर आरोपीने दगडफेक करत मारहाण केली आणि जखमी केले. याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात इछड कलम ११८(१), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

**नेहरूनगरमध्ये डोक्यात फरशी घालून ५० वर्षीय व्यक्तीचा निर्घृण खून; तिघांना अटक**

घटनास्थळ: संतोषामाता चौक ते झिरो बॉईज चौकादरम्यानचे फूटपाथ, नेहरूनगर, पिंपरी.

वेळ: रविवार, ४ ऑक्टोबर रोजी पहाटे १:३० वाजण्याच्या सुमारास.

फिर्यादी: गणेश प्रभाकर सरकटे (वय २४, रा. आंबेडकर नगर, नेहरूनगर).

आरोपी: रोहित उर्फ भाऊ जांब्या प्रकाश धोत्रे, अर्णव उर्फ अरव लोकेश उर्फ आरख्या, प्रणीत प्रशांत निकाळजे (वय १९) आणि सचिन राम साबळे (वय २९). (आरोपी क्र. १, ३ व ४ अटक). घटनाक्रम: अज्ञात कारणावरून फिर्यादींचे वडील प्रभाकर कुंडलिक सरकटे (वय ५०) यांच्या डोक्यात सिमेंटच्या चौकोनी फरशीने वार करून त्यांना गंभीर जखमी करत ठार मारले. संत तुकाराम नगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शेजाऱ्यांकडून झालेल्या मारहाणीत महिलेचा गर्भपात, समर्थ पोलिसांनी बहिण भावावर केला गुन्हा दाखल

■ पुणे : प्रतिनिधी

मोटारसायकलीचे चाक पायावरुन गेल्याने झालेल्या वादात पतीला मारहाण होत असल्याचे पाहून पत्नीने आरडाओरडा केला. त्यावरुन शेजारी राहणार्याच्या बहिणीने पत्नीला मारहाण केली. भावाने पोटात लाथ मारल्याने महिलेचा गर्भपात झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. समर्थ पोलिसांनी बहिण भावावर गुन्हा दाखल केला आहे. सज्जाद बबलु मेमन आणि सना बबलु मेमन (दोघे रा. भवानी पेठ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत एका ३७ वर्षाच्या तरुणाने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार भवानी पेठेतील रामप्रसाद चिवडावालाजवळ १ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री साडेनऊ वाजता घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे रात्री ९ वाजता घरासमोर उभे होते. त्यावेळी सज्जाद मेमन हा मोटारसायकलवरुन आला. त्याचे चाक फिर्यादी यांच्या पायावरुन गेले. तेव्हा त्यांनी तुझ्या गाडीला हॉर्न नाही का असे म्हटले. त्यावर सज्जाद याने गाडी बाजूला लावून फिर्यादी यांना हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांची पत्नी घराच्या दारात उभी होती. ती गरोदर असल्यामुळे भांडणामध्ये आली नाही. ती मोठ्याने माझ्या पतीला वाचवा, असे ओरडु लागल्याने शेजारी राहणारे तेथे आले व त्यांनी फिर्यादी यांना होणारी मारहाण थांबवली.

हे पाहून सज्जाद याची बहिण सना मेमन ही फिर्यादीच्या पत्नीच्या अंगावर धावुन गेली. तिचे केस पकडून तिला मारहाण करु लागली. त्यांच्या भांडणामध्ये सज्जाद गेला. त्याने पत्नीच्या पोटात लाथ मारली. त्यामुळे पत्नी खाली पडली. तिचा रक्तस्राव सुरु झाला. तिला ससून रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी पत्नीचा गर्भपात झाल्यामुळे रक्तस्राव झाल्याचे सांगितले. पत्नी गर्भवती असताना सना व सज्जाद मेमन यांनी मारहाण केल्याने पत्नीचा गर्भपात होण्यास कारणीभूत असल्याच्या आरोपावरुन दोघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक तानाजी शेगर तपास करीत आहेत.

# खडी क्रशरविरोधात बाधित शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

## लोणीत बेकायदा क्रशर व उत्खननावर कारवाईची मागणी; पुरावे देऊनही प्रशासनाकडून दुर्लक्षाचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

लोणी (ता. आंबेगाव) येथे गावातील कथित बेकायदा खडी क्रशर बंद करण्याच्या मागणीसाठी तसेच संबंधित प्रकरणात प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याचा आरोप करत बाधित शेतकऱ्यांनी सोमवारी (दि. ५) ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. सुखदेव आढाव, सखूबाई आढाव, विकास आढाव, धनश्री आढाव आणि गुलाब गायकवाड हे उपोषणाला बसले आहेत.




गावातील खडी क्रशर आणि कथित बेकायदा उत्खननाबाबत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे पुरावे सादर करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, प्रशासनाकडे आवश्यक पुरावे सादर करूनही कारवाई होत नसल्याने बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रश्न निकाली निघेपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवण्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे.

- ❋ उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या
- ❋ लोणी गावातील कथित बेकायदा खडी क्रशर तात्काळ बंद करावेत.
- ❋ बेकायदा उत्खननाच्या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.
- ❋ कथित खोट्या व बोगस ग्रामपंचायत ठरावांच्या आधारे मिळविलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवान्यांची चौकशी करून ते रद्द करावेत.
- ❋ संबंधित दोषी व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत.
- ❋ प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी.

# दुष्काळाची चाहूल की नियोजनाचा इशारा?

## १६ ऑक्टोबरपासून राज्यभर किमान १० टक्के पाणीकपात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

कमी पर्जन्यमान आणि मर्यादित जलसाठ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १६ ऑक्टोबर २०२६ पासून किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत धरणनिहाय आणि वापरनिहाय पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.



पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असून प्रत्येक धरणात १० टक्के आपत्कालीन बफर साठा ठेवण्याचे नियोजन आहे. बाष्पीभवन, गाळ आणि अनधिकृत उपसा लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे आरक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महापालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींना पाणीगळती रोखण्याबरोबरच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रक्रिया केलेले पाणी बागा, बांधकाम आणि धुलाईसाठी वापरण्यावर भर देण्यात येणार आहे.

शेतीमध्येही पिण्याचे पाणी, जनावरे आणि चाऱ्याची गरज भागवल्यानंतरच सिंचनासाठी पाणी दिले जाणार आहे. रब्बीतील भुसार व चारा पिकांना प्राधान्य देण्यात येणार असून औद्योगिक क्षेत्राला किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर अनिवार्य करण्यात आला आहे. सरकार 'सूक्ष्म नियोजन' म्हणत असले तरी १० टक्के पाणीकपातीचा निर्णय राज्यातील जलसंकट किती गंभीर आहे, याची जाणीव करून देणारा आहे. आता घोषणांपेक्षा पाण्याचा काटकसरीने आणि पारदर्शक वापर प्रत्यक्षात किती होतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

# वाकोबा मळ्यात बिबट मादी जेरबंद; शेतकऱ्यांनी सोडला सुटकेचा निःश्वास

## तरुण शेतकऱ्यावर हल्ल्यानंतर वनविभागाने लावला होता पिंजरा; आठ-दहा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर बिबट्या जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावाच्या दक्षिणेला असलेल्या वाकोबा मळा परिसरात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात पूर्ण वाढ झालेली बिबट मादी जेरबंद झाल्याची घटना सोमवारी (दि. ५) सकाळी उघडकीस आली. काही दिवसांपूर्वी याच परिसरात बिबट्याने तरुण शेतकऱ्यावर हल्ला केल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर आठ-दहा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर बिबट मादी पिंजऱ्यात अडकल्याने ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.



रांजणीच्या दक्षिणेकडील वाकोबा मळा परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊसशेती असून दाट ऊस, झाडी आणि पाण्याची उपलब्धता यामुळे या भागात बिबट्यांचा वावर असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे शेतीकामांसाठी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते.

बुधवार (दि. २३ सप्टेंबर) रोजी अक्षय रामदास वाघ हे शेताला पाणी देण्यासाठी गेले होते. पाण्याचा वॉल फिरवण्यासाठी ते खाली वाकले असता अचानक बिबट्याने त्यांच्यावर झडप मारली. मात्र, प्रसंगावधान राखत अक्षय वाघ यांनी बिबट्याचा प्रतिकार करून तेथून पळ काढला. पळताना पाय घसरून ते खाली पडले. या घटनेत ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले होते.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाने दुसऱ्याच दिवशी शिरीष सदानंद वाघ यांच्या शेतात पिंजरा लावला. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनकर्मचाऱ्यांकडून पिंजऱ्यावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत होते. अखेर सोमवारी सकाळी पिंजऱ्यात बिबट मादी अडकल्याचे निदर्शनास आले. या बिबट मादीचे वय अंदाजे चार ते पाच वर्षे असल्याची माहिती वनविभागाने दिली.

बिबट मादी जेरबंद झाल्याची माहिती मिळताच वळती बीटचे वनपरिक्षेत्र अधिकारी आर. एम. फुलमाळी, वनकर्मचारी महेश टेमगिरे तसेच गावडेवाडी बिबट कृती दलाचे धर्मेंद्र ढगे, प्रज्वल आवारी, चारुदत्त बांबळे, ओंकार मेंगडे आदी घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट मादीला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले.

बिबट मादी जेरबंद झाल्याने वाकोबा मळा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतीच्या कामांसाठी शेतात जाण्याची भीती काही प्रमाणात कमी झाली असली, तरी परिसरात आणखी बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता लक्षात घेऊन वनविभागाने गस्त वाढवावी आणि शेतकऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सॉफ्टवेअर कंपनीत गुंतवणुक करायला सांगून १ कोटी ८५ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरुन नर्हे पोलिसांनी एकाला केली अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

प्रोजेक्ट आणण्यासाठी ओळखी असल्याचे सांगून सॉफ्टवेअर कंपनीत गुंतवणूक करण्यास सांगून एका व्यावसायिकाची १ कोटी ८५ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरुन नर्हे पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

याबाबत तुषार तेजराम घडाळे (वय ४६, रा. सेलेस्टियल सिटी, रावेत) यांनी नर्हे पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी प्रविण दत्तू शेळके (वय ४०, रा. गणेश व्हिला सोसायटी, धायरी) यांना अटक करण्यात आली आहे. निता प्रविण शेळके आणि रिचर्ड पात्रिदगे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना नर्हे येथील नवले आयकॉन येथील प्रिस्टन इन्फो ग्लोबल सोल्युशन प्रा. लि. येथे २५ मे २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण शेळके, निता शेळके व रिर्चड यांनी संगनमत करुन कंपनीकरीता प्रकल्प मिळवून देण्याचे आश्वासन दिले. कंपनीचे बनावट ॲग्रिमेंट व कागदपत्रे पाठवून २ लाख ८० हजार रुपये घेऊन फसवणूक केली. फिर्यादी व त्यांचे मित्रांचा ई मेलद्वारे केलेला पत्रव्यवहार व करारनामे प्राप्त करुन ही कंपनी स्वत:चे मालकीची असल्याचे भासवुन संचालक असल्याचे सांगितले. आय टी कंपनी स्थापन करण्याकरीता विश्वास संपादन करुन कोणताही प्रकल्प देणार नसल्याचे माहिती असताना ही बनावट कागदपत्रे व करारनामा यांचा वापर करुन भागिदारीमध्ये कंपनी स्थापन केली.

# महायुतीत जागावाटपाचा पेच, आता मविआतही बंडाची ठिणगी; विधान परिषद निवडणुकीत मित्रपक्ष आमनेसामने!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या पाच जागांच्या निवडणुकीपूर्वी महायुतीपाठोपाठ महाविकास आघाडीतही जागावाटपाचा संघर्ष उघड झाला आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेसने उमेदवार जाहीर केल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने स्वतंत्र उमेदवार मैदानात उतरवल्याने मविआतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शिवसेनेने अमरावती शिक्षक मतदारसंघातून दत्तात्रय श्रीराम लहाने आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातून दिलीप हरिभाऊ घुगे यांना उमेदवारी दिली आहे. त्याआधी काँग्रेसने नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून अभिजित वंजारी, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत असगावकर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातून अदिती पोहरे यांची नावे जाहीर केली होती.



अमरावतीत दोन मित्रपक्ष आमनेसामने आल्याने मतविभाजनाची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे महायुतीतही पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांवरून तणाव आहे. भाजपने उमेदवार जाहीर केल्यानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीतील इच्छुक स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत.

शिवसेनेकडून मंगेश चिवटे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रताप उर्फ भय्या माने यांच्या नावांची चर्चा आहे. महाविकास आघाडीकडून हर्षदा जाधव-देशमुख यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे.

त्यामुळे विधान परिषद निवडणूक आता केवळ सत्ताधारी विरुद्ध विरोधक अशी राहिलेली नाही. मित्रपक्षांतील जागावाटप, स्थानिक नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा आणि मतविभाजन यामुळे दोन्ही आघाड्यांसमोर निवडणुकीपूर्वीच मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर कारखान्याच्या साखर वाटप धोरणात बदल

## ऊस उत्पादकांना ५० ते ८० किलोपर्यंत साखर; ६ ते १५ ऑक्टोबरदरम्यान गावनिहाय वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दीपावलीनिमित्त देण्यात येणाऱ्या साखर वाटपाच्या धोरणात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बदल करण्यात आला आहे. कारखान्याचे संस्थापक व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

नवीन धोरणानुसार गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या सभासद व ऊस उत्पादकांना त्यांच्या शेअर व ऊस पुरवठ्याच्या स्थितीनुसार ५० ते ८० किलो साखर देण्यात येणार आहे.

❋ पूर्ण व अपूर्ण शेअर्सची रक्कम जमा करून ऊस पुरवठा केलेल्या सभासदांना - ८० किलो

❋ केवळ पूर्ण शेअरची १५ हजार रुपये रक्कम जमा केलेल्यांना - ६० किलो

❋ केवळ ऊस पुरवठा केलेल्यांना - ६० किलो

❋ अपूर्ण शेअर्सची रक्कम जमा केलेल्यांना - ५० किलो

साखरेचे गावनिहाय वाटप १०, २० आणि ५० किलोच्या पॅकिंगमध्ये करण्यात येणार आहे. पारगाव, निरगुडसर, जांबूत, कळंब, रांजणी आणि मंचर गटातील काही गावांमध्ये यापूर्वीच वाटप करण्यात आले आहे.




गावनिहाय वाटपाचे वेळापत्रक

६ ऑक्टोबर : घोडेगाव गटातील सर्व गावे.

७ ऑक्टोबर : टाकळी हाजी, कवठे व करंदी गटातील सर्व गावे.

८ ऑक्टोबर : करंदी गटातील गावांसाठी गट कार्यालय.

९ ऑक्टोबर : जातेगाव, भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव गट; ओझर व उंब्रज गटासाठी गट कार्यालय; तसेच खोडद व पारगाव (मंगरूळ).

१० ऑक्टोबर : जातेगाव बु., भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव अंतर्गत संबंधित गावांसाठी गट कार्यालय; खेड गटासाठी मार्केट यार्ड, खेड.

११ ऑक्टोबर : पारगाव गटातील सर्व गावे.

१३ ऑक्टोबर : पारगाव गाव, निरगुडसर व जांबूत गटातील सर्व गावे.

१४ ऑक्टोबर : निरगुडसर गाव, कळंब व रांजणी गटातील सर्व गावे.

१५ ऑक्टोबर : मंचर गटातील सर्व गावे.

नियोजित दिवशी साखर घेता न आलेल्या सभासद व ऊस उत्पादकांना १६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कारखाना साईटवर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत साखर घेता येणार आहे. गुरुवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळता हे वाटप सुरू राहील. त्यानंतरही साखर न घेतलेल्या सभासदांना सप्टेंबर २०२७ पर्यंत कारखाना साईटवरून साखर घेता येणार आहे.

साखर घेताना सभासद व ऊस उत्पादकांनी कारखान्याचे स्मार्ट कार्ड आणि ओळखीचा पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

पुढील वर्षासाठी धोरण बदलण्याचा इशारा

हे साखर वाटप धोरण केवळ चालू वर्षापुरतेच मर्यादित असल्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी स्पष्ट केले.

सर्व शेअरधारकांनी आपल्या शेअर्सची अपूर्ण रक्कम कारखान्याकडे जमा करावी. अन्यथा पुढील वर्षी साखर वाटपाच्या धोरणात बदल करावा लागू शकतो, असे आवाहनही त्यांनी केले.

## सारांश वृत्त

### महासत्तांच्या खेळात भारताची मध्यस्थीची भूमिका; रशियावर दबावासाठी फ्रान्सचा आग्रह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या भूमिकेकडे आता युरोपचे लक्ष अधिक तीव्र झाले आहे. फ्रान्सचे युरोपियन व्यवहार मंत्री बेंजामिन हद्दाद यांनी भारताने आपल्या प्रभावाचा वापर करून रशियाला शांतता चर्चेच्या टेबलावर आणण्यासाठी आवाज उठवावा, असे आवाहन केले आहे. दिल्लीतील 'म्युनिक लीडर्स मीटिंग'दरम्यान त्यांनी भारत-फ्रान्सच्या 'धोरणात्मक स्वायत्तते'तील समानतेवरही भर दिला.

अमेरिका आणि चीन या महासत्तांमधील वाढत्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर युरोपीय देश आता 'मध्यवर्ती शक्तींच्या आघाड्या' उभारण्याचा प्रयत्न करत असल्याचे हद्दाद यांच्या वक्तव्यातून स्पष्ट होते. मात्र, भारताला उपदेश करण्याची भूमिका फ्रान्सची नसल्याचे सांगतानाच त्यांनी रशियावर आर्थिक दबाव वाढवण्यासाठी भारताने मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी भारत रशिया-युक्रेनदरम्यान विशिष्ट करारांसाठी मध्यस्थी करत असल्याचे संकेत दिल्यानंतर फ्रान्सकडून हे वक्तव्य आले आहे.

मात्र, येथे प्रश्न भारताच्या स्वायत्त परराष्ट्र धोरणाचा आहे. रशियाशी असलेले दीर्घकालीन संबंध, युक्रेनमधील शांततेची भूमिका आणि पाश्चिमात्य दबावया तिन्हींचा समतोल साधत भारत नेमकी कोणती भूमिका घेतो, याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे.

# एमएसपी वाढीचा '१०६ टक्के नफा' नेमका कुणाचा? शेतकरी मोर्चाचा सरकारला सवाल; रब्बी एमएसपी फेटाळली!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

रब्बी हंगामातील पिकांसाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीवर म्हणजेच एमएसपीवर संयुक्त किसान मोर्चाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सुमारे ५०० शेतकरी संघटनांचे छत्र असलेल्या संयुक्त किसान मोर्चाने ही एमएसपी वाढ शेतकऱ्यांचा अपमान असल्याचे म्हणत तीव्र विरोध नोंदवला आहे. सरकार शेतकऱ्यांशी बोलताना वॉशिंग्टनची भाषा वापरत असल्याची टीकाही संघटनेने केली आहे.

गव्हाच्या एमएसपीमध्ये सरकारने क्विंटलमागे अवघी २५ रुपयांची वाढ केली आहे. म्हणजेच किलोमागे फक्त २५ पैसे. आजच्या वाढत्या डिझेल, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि सिंचनाच्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही वाढ शेतकऱ्यांच्या उत्पादनखर्चाला किती आधार देणार, हा प्रश्न संयुक्त किसान मोर्चाने उपस्थित केला आहे. २५ पैसे किलोची वाढ डिझेलच्या एक-तृतीयांश लिटरची किंमतही भागवू शकत नाही, असा टोला संघटनेने सरकारला लगावला.




विशेष म्हणजे, सरकार या वाढीला '१०६ टक्के नफा' म्हणून मांडत असल्याचा आरोप किसान मोर्चाने केला आहे.

मग प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या हातात किती उत्पन्न उरते? उत्पादनखर्च, कर्ज, मजुरी, वाहतूक, वीज आणि बाजारातील चढ-उतार वजा केल्यानंतर शेतकऱ्याचा वास्तविक नफा किती आहे, याचे उत्तर सरकार देणार का?

शेतकरी संघटनेने ग्रामीण भागातील तरुणांच्या स्थलांतराचा मुद्दाही उपस्थित केला आहे. शेतीत खरोखरच १०६ टक्के नफा मिळत असेल, तर रोजगारासाठी गाव सोडून शहरांकडे जाण्याची वेळ ग्रामीण युवकांवर का येते, असा सवाल करण्यात आला आहे.

संयुक्त किसान मोर्चाने शेतकऱ्यांना आणि युवकांना प्रत्येक गावात सरकारच्या एमएसपीसंदर्भातील आदेशाच्या प्रती जाळण्याचे आवाहन केले आहे. तसेच घोषित एमएसपीचा पुनर्विचार करून ती उत्पादनखर्च आणि शेतकऱ्यांच्या वास्तविक आर्थिक परिस्थितीशी सुसंगत करण्याची मागणी केली आहे.

कागदावरची टक्केवारी आणि शेतकऱ्याच्या खिशात उरणारा पैसा यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. '१०६ टक्के नफा' सांगून सरकारने प्रश्न संपत नाही; तो नफा प्रत्यक्ष शेतकऱ्याला मिळतोय का, याचे उत्तर देण्याची वेळ आता सरकारवर आहे.

## सोन्याच्या दरांना डॉलरची झळ; फेडच्या निर्णयाकडे बाजाराचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

अमेरिकन डॉलरची मजबुती आणि अमेरिकेतील रोख्यांवरील वाढलेले परतावे यामुळे सोन्याच्या दरांवर दबाव कायम आहे. सोमवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव जवळपास स्थिर राहिला. स्पॉट गोल्ड ०.१ टक्क्यांनी घसरून प्रति औंस ४,१३७.७९ डॉलरवर आला, तर डिसेंबर डिलिव्हरीसाठी अमेरिकन गोल्ड फ्युचर्स ०.१ टक्क्यांनी वाढून ४,१६६ डॉलरवर पोहोचले.

विशेष म्हणजे, अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह ऑक्टोबरमध्ये व्याजदर वाढवण्याची शक्यता कमी होत असल्याने सोन्याला काहीसा आधार मिळत आहे. बाजारातील अंदाजानुसार ऑक्टोबरमध्ये दरवाढीची शक्यता केवळ २२ टक्के आहे, तर डिसेंबरमध्ये ती ८४ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. मात्र, मजबूत डॉलर आणि अमेरिकी ट्रेझरी रोख्यांवरील उच्च परतावे सोन्याच्या तेजीला रोखत आहेत.



बाजार विश्लेषक फवाद रझाकजादा यांच्या मते, डॉलरची वाढ आणि उच्च परताव्यामुळे सोन्याच्या किमतीत अल्पावधीत घसरण होऊ शकते; मात्र त्यानंतर खरेदीदार पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, फेडच्या सप्टेंबर बैठकीचे इतिवृत्त बुधवारी प्रसिद्ध होणार असून, त्यातून पुढील व्याजदर धोरणाचे संकेत मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, मेटल्स फोकसने २०२७ मध्ये सोन्याचे दर नव्या विक्रमी पातळीवर जाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे सध्या सोन्याच्या बाजारात तेजी आणि दबाव यांच्यातील संघर्ष स्पष्टपणे दिसत आहे.

## भारत-अमेरिका व्यापार कराराला ब्रेक; टॅरिफच्या कोंडीत मोदी सरकार! अर्थमंत्री म्हणतात 'पुढील सवलती देणे अत्यंत कठीण'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारत आणि अमेरिकेदरम्यान गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या व्यापार कराराच्या चर्चेला आता ठोस अडथळा निर्माण झाला आहे. दोन्ही देशांमधील व्यापार कराराच्या वाटाघाटी 'ठप्प' अर्थात एका टप्प्यावर येऊन थांबल्या आहेत, अशी स्पष्ट कबुली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी दिली. त्यामुळे भारत-अमेरिका आर्थिक संबंध अधिक मजबूत करण्याच्या केंद्र सरकारच्या दाव्यांसमोर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

फेब्रुवारी २०२५ पासून दोन्ही देशांमध्ये व्यापार करारासाठी चर्चा सुरू आहे. बाजारपेठेतील प्रवेश, शुल्क



आणि व्यापारातील असमतोल यांसारख्या गुंतागुंतीच्या मुद्द्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र आता दोन्ही बाजूंनी आणखी सवलती देणे 'अत्यंत, अत्यंत कठीण' असल्याचे सीतारामन यांनी म्हटले आहे. म्हणजेच करारासाठी आवश्यक असलेली तडजोड करण्याची दोन्ही देशांची तयारी मर्यादेपर्यंत पोहोचली आहे.

विशेष म्हणजे, अमेरिकेच्या टॅरिफ धोरणावरही अर्थमंत्र्यांनी टीका केली आहे. व्यापार वाटाघाटींसाठी शुल्काचा वापर हा केवळ आर्थिक धोरणाचा भाग राहिलेला नसून, त्याचे 'शस्त्रीकरण' होत असल्याचे त्यांनी म्हटले. त्यातच रशियाकडून भारताच्या तेल खरेदीशी संबंधित संभाव्य अमेरिकन टॅरिफमुळे तडजोडीची जागा आणखी कमी झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भारत-अमेरिका व्यापार करार हा केवळ आयात-निर्यातीचा विषय नाही. भारतीय उद्योग, निर्यातदार, शेतकरी, औषधनिर्मिती, उत्पादन क्षेत्र आणि अमेरिकन बाजारपेठेतील भारतीय कंपन्यांच्या भवितव्याशी तो जोडलेला आहे. त्यामुळे चर्चा ठप्प होणे ही सरकारसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे. एकीकडे भारताला जागतिक पुरवठा साखळीचा प्रमुख केंद्र बनवण्याचे, अमेरिकेसह धोरणात्मक आर्थिक भागीदारी मजबूत करण्याचे दावे केले जात आहेत; दुसरीकडे प्रत्यक्ष व्यापार वाटाघाटी मात्र टॅरिफच्या कोंडीत अडकल्या आहेत. 'अमेरिकेसोबतची मैत्री' आणि 'व्यापारातील तडजोड' यात फरक असतो. आता प्रश्न असा आहेभारत आपल्या आर्थिक हितसंबंधांशी तडजोड न करता अमेरिकेसोबत करार साधणार कसा?

# तिसऱ्या अपत्याचा मुद्दा भोवला? अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत राम शिंदेंची माघार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली ।प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी उमेदवारी न करण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या संभाव्य उमेदवारीवरून गेल्या काही दिवसांपासून 'तिसऱ्या अपत्याचा' मुद्दा चांगलाच गाजत होता. विरोधकांनी सहकार कायद्यातील तरतुदीचा आधार घेत राम शिंदे यांची उमेदवारीच अपात्र ठरू शकते, असा दावा केला होता.

राम शिंदे यांनी मात्र आपला निर्णय कोणत्याही राजकीय दबावामुळे किंवा व्यक्तिगत कारणामुळे घेतलेला नसल्याचे




स्पष्ट केले. घटनात्मक पदाची प्रतिष्ठा आणि निष्पक्षता जपण्यासाठी जिल्हा बँकेची निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

कर्जत-जामखेडमधील दोन संस्थांच्या माध्यमातून आपला ठराव बिनविरोध झाल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तीन अपत्यांच्या मुद्द्यावरून विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न कायम आहेत.

सहकार कायद्यानुसार ७ सप्टेंबर २००२ नंतर तिसरे अपत्य जन्माला आले असल्यास संबंधित व्यक्तीला सहकारी संस्थेची निवडणूक लढवता येत नाही, अशी तरतूद असल्याचे सांगितले जाते.

त्यामुळे राम शिंदेंची माघार केवळ 'निष्पक्षतेचा निर्णय' आहे की कायदेशीर वाद टाळण्याची रणनीती, याची चर्चा आता सुरू झाली आहे.

## ज्ञानेश कुमार यांना निलंबित करण्याची मागणी; सुप्रीम कोर्टाचा अंतरिम आदेशाला नकार, पण आयोगाला नोटीस!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निलंबनाची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने तातडीने अंतरिम आदेश देण्यास नकार दिला आहे. मात्र, प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच इतर दोन निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर करण्यात आलेल्या आरोपांबाबत स्पष्ट स्पष्टीकरण मागितले आहे. आयोगाने कायद्याने निर्धारित नियमांचे पालन केले की नाही, याची तपासणी आधी केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित निर्णय रद्द करण्याचा पर्याय खुला असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.



फॉर्म-६मध्ये बदल करण्यास न्यायालयाने परवानगी दिली नव्हती, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. रेकॉर्ड सादर झाल्यानंतर बदल कोणी केले, याचीही तपासणी केली जाणार आहे.

याचिकाकर्त्यांने अंतिम सुनावणीपर्यंत ज्ञानेश कुमार यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या अनुपस्थितीत सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी संयुक्तपणे आयोगाचा कारभार पाहावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

अंतरिम दिलासा नाकारला असला तरी सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरील वाद आता न्यायालयीन तपासणीच्या टप्प्यावर पोहोचला आहे.

## एसआयआरवरून विरोधक आक्रमक; आज 'इंडिया' आघाडीचा निवडणूक आयोगावर घेराव!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल उजळणी अर्थात एसआयआरच्या मुद्द्यावरून केंद्रातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होणार आहे. १९ विरोधी पक्षांचे नेते ६ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर घेराव घालणार आहेत. 'इंडिया' आघाडीचे खासदार संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत सुमारे तीन किलोमीटरचा 'लोकशाही वाचवा मार्च' काढणार आहेत.

३० सप्टेंबर रोजी कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये झालेल्या बैठकीत विरोधकांनी तीन प्रमुख मागण्यांवर सहमती दर्शवली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणणे, मतदार याद्यांमधून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करणे आणि संबंधित मतदाराला नोटीस व अपीलची संधी देणे, या मागण्या त्यात आहेत.

याशिवाय ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्याची मागणीही विरोधकांनी केली आहे.

मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाचा अधिकार निवडणूक आयोगाला असला तरी त्यातील प्रक्रिया पारदर्शक आणि पडताळणीयोग्य असावी, असा विरोधकांचा आग्रह आहे. दुसरीकडे आयोगाची भूमिका आणि एसआयआरची कायदेशीर प्रक्रिया यावरही देशभर चर्चा सुरू आहे.

यापूर्वीही विरोधकांनी आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता. आता १९ पक्ष एकत्र येत असल्याने एसआयआरचा मुद्दा केवळ निवडणूक प्रक्रियेपुरता न राहता केंद्रातील सत्ताधारी आणि विरोधकांमधील मोठ्या संस्थात्मक संघर्षाचे रूप घेताना दिसत आहे. .

# महिलांच्या सुरक्षेवर सर्वोच्च न्यायालय संतप्त; गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती निर्माण करण्याची वेळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

दिल्ली-एनसीआरमध्ये महिलांवरील बलात्काराच्या वाढत्या घटनांवर अखेर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय नसून, तो राज्याच्या जबाबदारीशी थेट जोडलेला आहे, याची जाणीव न्यायालयाने सरकार आणि प्रशासनाला करून दिली आहे. महिलांविरोधात गुन्हे करणाऱ्या गुंडांच्या मनात भीती निर्माण करण्याची गरज आहे, असे स्पष्ट निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केले. प्रश्न इतकाच आहे की, न्यायालयाला ही चिंता व्यक्त करण्याची वेळ का आली? महिलांना सुरक्षित वाटण्यासाठी न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागतो, हीच व्यवस्था आणि सरकारच्या कार्यक्षमतेवर गंभीर टिप्पणी नाही का?

न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर दिल्ली-एनसीआरमधील अलीकडील बलात्काराच्या घटनांबाबत स्वतःहून दाखल झालेल्या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, दिल्ली-एनसीआरमधील प्रत्येक महिलेला रात्री अकरा वाजताही सुरक्षित वाटले पाहिजे. ती रस्त्यावरून प्रवास करत असो किंवा मेट्रोमधून, तिच्या मनात असुरक्षिततेची भावना असता कामा नये. हे विधान केवळ न्यायालयीन निरीक्षण म्हणून दुर्लक्षित करण्यासारखे नाही. देशाच्या राजधानीत महिलांना रात्री बाहेर पडताना भीती वाटत असेल, तर सुरक्षिततेच्या सर्व दाव्यांचे वास्तव काय आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील काही संवेदनशील आणि असुरक्षित भागांबाबत नागरिकांमध्ये महिलांच्या सुरक्षेविषयी भीतीची भावना असल्याचेही अधोरेखित केले. म्हणजेच प्रश्न केवळ एखाद्या एका घटनेचा नाही. प्रश्न आहे तो प्रतिबंधक यंत्रणेचा. गुन्हा घडल्यानंतर आरोपीला अटक करणे, तपास करणे आणि खटला चालवणे ही कायदेशीर प्रक्रिया आहेच; मात्र गुन्हा घडण्यापूर्वीच संभाव्य गुन्हेगारांच्या मनात कायद्याची धास्ती निर्माण करणे, ही राज्याची खरी कसोटी आहे.

आम्हाला एकत्रितपणे काम करावे लागेल, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. पण या 'एकत्रित कामा'त सरकार, पोलीस प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांची भूमिका नेमकी किती प्रभावी आहे? महिलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, गस्त, प्रकाशव्यवस्था, तातडीची मदत, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि संवेदनशील ठिकाणी पोलिसांची उपस्थिती याबाबत ठोस परिणाम दिसत आहेत का? की घटना घडल्यानंतर बैठका, आश्वासने आणि कडक कारवाईच्या घोषणा एवढ्यावरच सरकारचे काम थांबणार आहे?

महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न राजकीय घोषणांचा विषय नाही. तो नागरिकांच्या मूलभूत सुरक्षिततेचा प्रश्न आहे. राजधानीत रात्री अकरा वाजता एका महिलेला मी सुरक्षित आहे असे वाटणे ही कोणतीही विशेष मागणी नाही; ती राज्यव्यवस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. न्यायालयाने आज ती जबाबदारी सरकारसमोर पुन्हा स्पष्टपणे ठेवली आहे.

आता प्रश्न सर्वोच्च न्यायालयाचा नाही, सरकारचा आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केल्यानंतरही प्रशासनाची यंत्रणा केवळ कागदोपत्री सक्रिय राहणार आहे का? की प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती आणि महिलांच्या मनात सुरक्षिततेचा विश्वास निर्माण केला जाणार आहे?

कारण महिलांना सुरक्षित वाटण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आवाज उठवावा लागणे, हीच व्यवस्था कुठेतरी अपयशी ठरत असल्याची गंभीर घंटा आहे.